नियमीत फौजदारी खटला क्र. **८३/२०२०**
निशाणी क्र. **१९/क**

**<u>दोषारोप पूर्वीची सुनावणी</u>**

**फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

माझे संपूर्ण नांव : **शेषराव बाबुराव सुर्यवंशी**
वय सुमारे : ६१ वर्षे, व्यवसाय : सेवानिवृत्त पोलीस अधिक्षक
निवासस्थान : पुणे

**<u>सरतपासणी फिर्यादी पक्षातर्फे सहा. सरकारी वकील श्रीमती कविता परीट यांचेमार्फत</u>** :

जुलै २०१५ ते जानेवारी २०१६ पर्यंत मी उपविभागीय पोलीस अधिकारी, पोर्ट विभाग येथे अतिरिक्त कारभार पाहात होतो. दि. ०१/१०/२०१५ रोजी पी.एस्.आय्. काशिनाथ माने, उरण पोलीस ठाणे यांनी ध्वनी प्रदूषण कायद्याचे उल्लंघन केल्याचे कारवाईचा अहवाल सादर केला. आता मला तो अहवाल दाखवला. त्यावर पी.एस्.आय्. माने यांची सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. मी पी.एस्.आय्. माने यांची सही ओळखतो. सदरच्या अहवालास **निशाणी क्र. २०** देण्यात येते.

०२. सदर अहवालासोबत श्री. माने यांनी केलेल्या कार्यवाहीची कागदपत्रे, पंचानामे, डेसीबल मीटर रिडींग, साक्षीदारांचे जबाब इत्यादी कागदपत्रे प्राप्त झाली. मी सदर कागदपत्रांचे अवलोकन केले व त्याच दिवशी मी श्री. महेश बालदी, गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष यांना प्रदुषण कायद्यांतर्गत कारणे दाखवा नोटीस जारी केली. सदर नोटीशीवर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. २१** देण्यात येते. त्यांना नोटीस तामीळ झाल्याची स्थळप्रत या प्रकरणात दाखल असून त्यावर माझी व आरोपीची सही आहे. त्या स्थळप्रतीस **निशाणी क्र. २२** देण्यात येते.

०३. सदर नोटीसला आरोपीने कोणताही खुलासा केलेला नाही. म्हणून दि. १९/१२/२०१५ रोजी सदरच्या कायद्याच्या तरतुदींतर्गत मी प्रथम वर्ग, न्यायदंडाधिकारी, उरण येथे तक्रार दाखल केली. आता मला सदरची तक्रार दाखवण्यात आली ती तिच आहे. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदरची तक्रार उरण न्यायालयात व्हेरीफाय करुन घेतली आहे.

०४. फिर्यादीसोबत दाखल असणा—या दाखल कागदपत्रांच्या यादीवर माझी सही आहे. सदरच्या यादीला **निशाणी क्र. २३** देण्यात येते. मी आरोपीला ओळखतो. तो आज रोजी न्यायालयात हजर आहे.

०५. मा. उच्च न्यायालयाच्या रिट पिटीशन क्र. १७३/२०१० मध्ये ध्वनी प्रदूषणाबाबत जी मार्गदर्शीका जारी करण्यात आली होती, त्यांचे उल्लंघन करु नये. ध्वनी प्रदूषण परवाना देताना अटी व शर्ती लेखी स्वरुपात आरोपीला कळवण्यात आल्या होत्या, असे असताना दि. २७/०९/२०१५ रोजी गणेशोत्सव मंडळ, स्वामी विवेकानंद चौक, उरणचे अध्यक्ष श्री. महेश बालदी यांनी गणेश मिरवणूक दरम्यान आयडील चौकामध्ये रात्री २२.४५ च्या दरम्यान ढोल ताशा मोठ्या आवाजात वाजवून रात्री १०.०० नंतर वाद्य न वाजवण्याच्या अटीचे उल्लंघन केले. त्यावेळी ९२.७ डेसीबल रिंडींग होती जे की, रहीवाशी क्षेत्राच्या मर्यादेचे उल्लंघन करणारे होते. म्हणून त्यांच्याविरुद्ध कार्यवाही म्हणून सदरची तक्रार आहे.

०६. आता मला आरोपीला दिलेले परवाना पत्र दाखवले. ते तेच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यास **आर्टीकल 'अ'** देण्यात येते.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. अंकीत बंगेरा यांचेमार्फत</u>** :

०७. हे म्हणणे खरे आहे की, सदरची फिर्याद ही आमच्या कार्यालयातील कायदेशीर मंडळाच्या सल्ल्याने दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरच्या फिर्यादीसोबत स्वतंत्र प्रतिज्ञापत्र दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीमध्ये जवळपास १० परिच्छेद आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझे

सत्यापन केवळ परिच्छेद क्र. ०१ ते ०६ साठीच आहेत. हे म्हणणे खरे आहे की, खाजगी फिर्याद दाखल करण्यापूर्वी पर्यावरण संरक्षण कायद्यांतर्गत कलम १९ प्रमाणे आरोपीला किमान ६० दिवसांची नोटीस द्यावी लागते.

०८. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. २१ व २२ कडील वरीलप्रमाणे असणा–या नोटीसमध्ये आरोपीला सात दिवसांची नोटीस दिली आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर नोटीस ही पर्यावरण संरक्षण कायदा कलम १९ प्रमाणे आहे. हे म्हणणे खोटे आहे की, पर्यावरण संरक्षण कायदा कलम १९ प्रमाणेच्या आवश्यक असणा–या तरतुदींचे मी पालन केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदरहू खटल्यात जे वादक आहेत, बेंजो, ढोल ताशा वगैरे वाजवणारे यांच्यावर कोणतीही कार्यवाही झालेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, ढोल ताशा पथकाचे सुद्धा आम्ही हमीपत्र मिळवलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, ढोल ताशा पथकाचा कोणताही जबाब नोंदवलेला नाही.

०९. हे म्हणणे खरे आहे की, मी स्वत: घटनास्थळी नव्हतो. मी सदरची फिर्याद सहा. पोलीस आयुक्त म्हणून दाखल केलेली आहे. मी ध्वनी प्रदूषण कायदा कलम २ चे अवलोकन केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, या कायद्याच्या अनुषंगाने गृह खात्याचे परिपत्रक सुद्धा आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या परिपत्रकाप्रमाणे फिर्याद दाखल करणारी व्यक्ती ही डेप्युटी कमिशनर ऑफ पोलीस या दर्जाखालची नसावी. हे म्हणणे खोटे आहे की, मला सहा. पोलीस आयुक्त म्हणून सदरची फिर्याद दाखल करण्याचा कोणताही अधिकार नाही.

१०. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीमध्ये आयडील चौक येथे मोठ्याने आवाज येत होता असा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदरचे आवाज मोजमापाचे यंत्र, डेसीबल मीटर हे मी स्वत: तपासलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, गणेश विसर्जनाच्या मिरवणुका एकापाठोपाठ निघालेल्या असतात. हे म्हणणे खरे

आहे की, तेथे बरीचशी गर्दी असते. हे म्हणणे खरे आहे की, प्रत्येक मंडळाचे वेगळे ढोल ताशा पथक असते. हे म्हणणे खरे आहे की, एका ढोल ताशा पथकाचा आवाज ५०—६० मीटर परिसरात पसरत असतो. हे म्हणणे खोटे आहे की, त्यामुळे कोणत्या ढोल ताशा पथकाचा आवाज डेसीबल मीटर मोजत आहे हे आपल्याला सांगता येणार नाही.

११. हे म्हणणे खोटे आहे की, मंडळाला महेश बालदी या नावाने परवानगी दिली होती हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मा. उच्च न्यायालयात जनहीत याचीका दाखल होती की, अशा प्रकारे ध्वनी प्रदूषण करणा—याविरुद्ध कारवाई करा, त्या अनुषंगाने आम्हाला कारवाई करण्यास सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या अनुषंगाने वरिष्ठांकडून पाठपुरावा देखील होत होता.

१२. त्या दिवशी १०—१२ केसेस आम्ही दाखल केल्या होत्या. हे म्हणणे खोटे आहे की, यापूर्वी मी अशा केसेस दाखल केलेल्या नव्हत्या. हे म्हणणे खोटे आहे की, वरिष्ठांना दाखवण्यासाठी मी खोटी केस दाखल करुन खोटी कारवाई केलेली आहे. हे म्हणणे खोटे आहे की, ध्वनी प्रदूषण कायद्याचे व पर्यावरण संरक्षण कायद्याचे उल्लंघन होवून सदरचा आवाज ९३.६० डेसीबल असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खोटे आहे की, मी खोटी व चुकीची केस दाखल करुन खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खोटे आहे की, मी कोणत्याही कायद्याच्या तरतुदींचे पालन केलेले नाही. हे म्हणणे खोटे आहे की, श्री. माने यांच्या निशाणी क्र. २० वरील चुकीच्या अहवालावर आधारीत मी चुकीची फिर्याद दाखल केली आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत

अलिबाग. ( **सौ. सुनयना स. पिंगळे** )
दिनांक : २४/०२/२०२२. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड—अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **८३/२०२०**
निशाणी क्र. **४२/क**

**<u>कलम २४४(१) फौजदारी प्रक्रिया संहिता अन्वये दोषारोपापूर्वीचा पुरावा</u>**

## फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०२ यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

माझे संपूर्ण नांव : **नवनाथ कृष्णा गावंड**
वय सुमारे : ३९ वर्षे, व्यवसाय : कोतवाल नोकरी
निवासस्थान : उरण, जि. रायगड

**<u>सरतपासणी फिर्यादी पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी वकील श्रीमती नईमा घट्टे यांचेमार्फत</u>** :

दि. २६/०९/२०१५ रोजी उरण पोलीस ठाण्यातील माने यांनी मला पोलीस ठाण्यात पंचनाम्यासाठी पंच म्हणून बोलावले होते. गणपती विसर्जनामध्ये झालेल्या आवाजाचा पंचनामा होता. त्या दिवशी मला पोलीसांनी विमला तलाव व त्यानंतर एन्.एम्.एम्.टी. डेपो येथे पंचनाम्यासाठी जायचे असल्याचे सांगितले. मी दोन्ही ठिकाणी गेलो होतो. तेथे विकास पाटील व पोलीस होते.

०२. पोलीसांनी मला एक मशिन दाखवली होती. पोलीस ती मशीन ऑपरेट करत होते. त्या मशीनमध्ये आवाजाची नोंद घेत होते. मशीनमधून स्लीप आली होती. किती स्लीप्स आल्या होत्या हे माझ्या लक्षात नाही. माझ्या समक्ष मशीन ऑपरेट केली होती व स्लीप काढल्या होत्या. पंचनामा सायं. ७.३० ते रात्री १०.३० या दरम्यान केला होता. (साक्षीदाराने दि. २६/०९/२०१५ रोजीचा ध्वनीमापन पंचनामा बघितला.) सदर पंचनामा तोच आहे की नाही हे मी सांगू शकत नाही. पंचनाम्यावर मी सही केली होती. पोलीसांनी त्याच दिवशी पंचनामा केला नव्हता. दुस—या — तिस—या दिवशी पोलीसांनी मला पोलीस ठाण्यात बोलावले होते व त्या दिवशी पंचनामा लिहीला होता. पंचनाम्यावर माझी सही आहे. पंचनामा **निशाणी क्र. ४३** वर आहे. मशीनमधून आलेल्या सलीप्स वर माझ्या सह्या आहेत.

सदर स्लीप्स त्याच आहेत की नाही हे मी सांगू शकत नाही. सह्या **निशाणी क्र. ४४** ते **४८** वर आहेत.

०३. त्यानंतर मला पोलीसांनी बोलावले नव्हते. पहिल्यांदा ज्यावेळी मला बोलावले होते त्याच वेळी मी सह्या केल्या होत्या. पंचनाम्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. पंचनामा **निशाणी क्र. ४९** वर आहे. स्लीप्सवर माझ्या सह्या आहेत. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्या अनुक्रमे **निशाणी क्र. ५० ते ५४** वर आहेत.

**(साक्षीदार त्याच्या पूर्वीच्या बयाणावर कायम नसल्याने अभियोग पक्षाने त्याला सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी दिली**.)

०४. हे म्हणणे खरे आहे की, दि. २७/०९/२०१५ रोजी माने पोलीसांनी मला पंच म्हणून पोलीस ठाण्यात बोलावले होते. साक्षीदार स्वतःहून सांगतो की माझे काम असल्याने मी गेलो होतो. मी त्यांना येणार नाही हे तोंडी सांगितले होते. साक्षीदार स्वतः सांगतो की, पोलीसांनी मला सांगितले होते की, ते पंचनामा तयार करणार आहेत व त्यांनी मला येवून सही करायला सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, दि. २७/०९/२०१५ रोजी विविध गणेश मंडळातील ध्वनीक्षेपणाचे मापन करायचे आहे असे मला पोलीसांनी सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, गणेश मिरवणुकीत वाजवण्यात येणा–या वाद्यातून येणा–या ध्वनीचे मापन करायचे आहे व त्यासाठी मला पंच म्हणून बोलावले होते.

०५. माझे शिक्षण ग्रॅज्युएशनपर्यंत झालेले आहे. मी नवघर येथे कोतवाल या पदावर आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी शासकीय कर्मचारी आहे. २ ते ३ दिवसांनंतर पंचनाम्यावर सही का करु? असे मी पोलीसांना विचारले नव्हते. पंचनाम्यावर माझ्या २–३ दिवसांनी सह्या घेतल्याबाबत मी पोलीसांच्या वरिष्ठांकडे तक्रार केली नाही. दि. २७/०९/२०१५ रोजी पोलीसांनी मला तयार पंचनाम्यावर

सही करायला सांगितले होते याबाबत मी कुठेही तक्रार केली नाही व पोलीसांनाही याबाबत विचारणा केली नाही. पंचनाम्याला न जाता सही करता येत नाही याची मला माहिती आहे. तरीही मी दि. २७/०९/२०१५ रोजीच्या पंचनाम्यावर सही केली. निशाणी क्र. ५० ते ५४ कडील स्लीप्सवर माझ्या सह्या घेतल्याबाबत मी पोलीसांच्या वरिष्ठांकडे तक्रार केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझी नेमणूक शासनाने केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि. २७/०९/२०१५ रोजीचा पंचनामा माझ्या समक्ष झालेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, दि. २६/०९/२०१५ रोजीचा पंचनामा मी वाचून पंचनाम्यावर सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, दि. २६/०९/२०१५ रोजीच पंचनामा तयार केला व त्याच दिवशी मी त्यावर सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, दि. १७/०९/२०१५ रोजीचा पंचनामा माझ्या समक्ष तयार केलेला नसून त्यावर मी दुस–या तिस–या दिवशी सह्या केल्या, हे मी खोटे सांगत आहे.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. अंकीत बंगेरा यांचेमार्फत</u>** :

०६. दि. २६/०९/२०१५ रोजी माझ्यापुढे पंचनाम्याची लिखाईपढाई झाली नव्हती. स्लीपवर काय लिहीलेले आहे, हे मला माहीत नाही. मी संपूर्ण सह्या पोलीस ठाण्यात केलेल्या आहेत. ध्वनीमापन यंत्र कसे वापरले जाते, याची मला माहिती नाही. मला त्या यंत्राचे कॅलीबरेशन माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, स्लीप्स काढून त्यावर मी सह्या केल्या, हे मी खोटे सांगत आहे.

**पुढील उलटतपास दोषारोप निश्चितीपर्यंत तहकूब करण्यात आला**.

श्रवणोत्तर स्वीकृत — समक्ष

**( शै. वा. उगले )**
मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

**( शै. वा. उगले )**
मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

अलिबाग.
दिनांक : **०८/०२/२०२४**.

नियमीत फौजदारी खटला क्र. **८३/२०२०**
निशाणी क्र. **७२/क**

**<u>कलम २४४(१) फौजदारी प्रक्रिया संहिता अन्वये दोषारोपापूर्वीचा पुरावा</u>**

## फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०३ यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **काशिनाथ अनंतराव माने** |
| वय सुमारे | : | ४४ वर्षे, व्यवसाय : सहाय्यक पोलीस निरीक्षक |
| सध्या नेमणूक | : | आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई |
| निवासस्थान | : | वाशी, सेक्टर ३, नवी मुंबई |

**<u>सरतपासणी फिर्यादी पक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. प्रसाद पाटील यांचेमार्फत</u>**:

दि. २७/०९/२०१५ रोजी मी पोलीस उपनिरीक्षक म्हणून उरण पोलीस ठाणे येथे कार्यरत होतो. दि. २७/०९/२०१५ रोजी सार्वजनिक गणेशोत्सव विसर्जन मिरवणूक पार पडणार होती. त्या अनुषंगाने मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. गलांडे यांच्या आदेशाने ध्वनी प्रदूषण नियंत्रक पथक स्थापन करण्यात आले होते. त्या पथकाचा मी प्रमुख होतो. माझ्यासोबत पोलीस शिपाई माने, पोलीस शिपाई धारकर व पोलीस शिपाई मोहीते असे पथकात सहभागी होते. ध्वनीमापन यंत्रणेचे मोजमाप करण्यासाठी पोलीस शिपाई वैभव माने यांची नेमणूक करण्यात आली होती. या पथकावर नियंत्रण म्हणून वरिष्ठ पोलीस निरीक्षक गलांडे हे काम पाहात होते.

०२. दि. २७/०९/२०१५ रोजी गणेशोत्सव विसर्जन मिरवणूक उरण शहारात पार पडणार होती. त्याकरीता वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी उरण पोलीस ठाणे हद्दीतील मंडळांना त्यांच्याकडून ध्वनी प्रदूषण होवू नये म्हणून मंडळाच्या बैठका घेवून ध्वनी प्रदूषण टाळावे असे आवाहन केले होते. बऱ्याच मंडळांनी सदर आवाहनास सकारात्मक प्रतिसाद दिला होता. असे असतानाही दि. २७/०९/२०१५

रोजी उरण पोलीस ठाणे हद्दीतील राजपाल नाका, देवूळवाडी नाका, अपना बाजार व कामठा रोड येथे मिरवणूक दरम्यान ढोल व ताशांचा मोठ्या प्रमाणात वापर होवून ध्वनी प्रदूषणाचा भंग होणार असल्याची माहिती मिळाली. त्याकरीता मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्या आदेशाने सदर ध्वनी प्रदूषण होवू नये याकरीता व झाले तर त्याची कार्यवाही करण्याकरीता दोन पंचांसमक्ष त्या मंडळाच्या ढोल ताशांचे मोजमाप घेण्यासाठी व तसा रितसर पंचनामा करण्यासाठी आम्ही उरण पोलीस ठाणे हद्दीत रवाना झालो.

०३. पथकासह आम्ही १०:३० वाजताच्या सुमारास उरण येथील फ्रेश कॉर्नर या ठिकाणी आलो असता त्या ठिकाणी असलेले सिद्धीविनायक गणेशोत्सव मंडळ, सातरहाटी उरण मंडळाचे अध्यक्ष काशिनाथ पाटील यांनी त्यांच्या मंडळासमोर भाडेतत्वावर आणलेले दिलीप उंबरकर यांचे ढोल ताशा मंडळ व पथक कर्णकर्कश आवाजामध्ये ध्वनी प्रदूषण करत असल्याचे समजले. मंडळाचे अध्यक्ष तसेच ढोल ताशा मंडळाचे अध्यक्ष यांना तुमच्या वाद्यांचा आवाज मोठा आहे, तो कमी करा मोठ्या आवाजामुळे ध्वनी प्रदूषण होत आहे आणि ते बेकायदेशीर आहे असे सांगितले असता त्यांनी काहीएक ऐकले नाही. त्यामुळे त्यांच्या ढोल ताशा मंडळाच्या वाद्यांचा पोलीस शिपाई वैभव माने यांनी ध्वनीमापन केले असता ते कायद्याने व नियमाने घालून दिलेल्या अटीनुसार जास्त असल्याचे आढळून आले. त्याचे मोजमाप घेवून आम्ही पुन्हा पुढे आयडीयल बाजार या ठिकाणी पोहोचलो. त्या ठिकाणी श्री गणेशोत्सव मंडळ, स्वामी विवेकानंद चौक या मंडळाचे अध्यक्ष श्री. महेश रतन बालदी यांच्या मंडळाने भाडेतत्वावर आणलेले ओमकार घरत यांचे ढोल ताशा मंडळ हेही कर्णकर्कश आवाजात ध्वनी प्रदूषण करत असल्याचे दिसून आले. मंडळाचे अध्यक्ष व ढोल ताशा मंडळाचे अध्यक्ष यांना सूचना देवूनही त्यांनी काहीएक ऐकले नसल्याने त्यांच्या ढोल ताशांचा पोलीस शिपाई वैभव माने यांच्याकडून ध्वनी

नियंत्रक यांच्या सहाय्याने मापन केले असता कायद्याने घालून दिलेल्या अटी व शर्तींचा भंग झाल्याचे दिसून आले.

०४. तसेच कामठा रोड व देवूळवाडी नाका तसेच पेडणेकर ज्वेलर्स या ठिकाणी असलेले ढोल ताशा मंडळ व गणेश मंडळाचे अध्यक्ष यांच्याकडून ध्वनी प्रदूषण होत असल्याबाबत समजल्यावर त्यांच्यावरही वरीलप्रमाणे कार्यवाही करुन दोन पंचांच्या समक्ष पंचनामा करण्यात आला. मंडळाचे अध्यक्ष यांना पंचनाम्याची प्रत देत असताना त्यांनी ती स्वीकारली नाही. ध्वनी मापन करत असताना ध्वनी मापन यंत्राच्या सहाय्याने नोंदी घेण्यात आलेल्या नोंदीची प्रत त्यांना देत असताना त्यांनी नाकारली. या गोष्टींचा पंचनाम्यात उल्लेख करुन पंचनामा करत असताना केलेले छायाचित्र, त्याच्या दोन सीडीज् बनवून उपस्थित साक्षीदारांचे जबाब नोंदवून पुढील कार्यवाहीसाठी मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, पोटविभाग, उरण यांना प्रस्ताव सादर केला. मी आरोपीला पाहिल्यास ओळखू शकेन. आरोपी आज न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. अंकीत बंगेरा यांचेमार्फत</u>** :

उलटतपास दोषारोप निश्चित होईपर्यंत तहकूब करण्यात आला.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग.
दिनांक : **०९/१०/२०२५**.

( **एम्. बी. अत्तार** )
मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

<u>**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. अंकीत बंगेरा यांचेमार्फत**</u>: (**दृक–श्राव्य प्रणालीद्वारे**)

०५. हे म्हणणे खरे आहे की, मला पथकाचे प्रमुख म्हणून नेमल्याबाबत मी कागदोपत्री पुरावा तपासी अंमलदारांना दिला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, दि. २६/०९/२०१५ रोजी कोणतेही विसर्जन नव्हते. ध्वनी मापन यंत्राचा वापर वैभव माने करत होते मी करत नव्हतो. ध्वनी मापन यंत्र हे मुद्देमाल कारकूनाच्या ताब्यात असते. तो कंपनीचा होता व काय कॅलीबरचा होता हे मी आज सांगू शकत नाही. दि. २६/०९/२०१५ रोजी आम्ही ते ध्वनी मापन यंत्र वापरले होते. हे म्हणणे खरे आहे की, या केसच्या अगोदर ध्वनी मापन यंत्र कोणी कोणी हाताळले होते याची माहिती मला नाही.

०६. २७ तारखेला आम्ही ५ ते ६ तपासण्या केल्या होत्या. सर्व मिरवणूका एकामागे एक अशा होत्या. हे म्हणणे खरे आहे की, प्रत्येक मिरकवणुकीमध्ये बॅन्जो व डि.जे. वेगवेगळे होते. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही डी.जे. व बॅन्जो जप्त केले नाही. या केससंबंधीत ढोलताशा पथक ओंकार घरत यांचा होता. हे म्हणणे खरे आहे की, श्री गणेश उत्सव मंडळ यांच्या मिरकवणुकीमध्ये ढोलताशा पथक होते. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही ढोलताशा पथकाचे साहित्य जप्त केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मिरवणुकीपूर्वी आम्ही ढोलताशा पथकाकडून हमीपत्र लिहून घेतले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या हमीपत्रामध्ये असे लिहून दिले की ध्वनीप्रदूषणाच्या अटीचा भंग झाल्यास ढोलताशा जप्त करण्यात येईल व त्यांच्यावर कारवाई करता येईल. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही ओंकार घरत यांच्यावर कार्यवाही केली नाही.

०७. ध्वनी मापन यंत्र आम्ही दि. २६/०९/२०१५ रोजी ताब्यात घेतले होते. काम झाल्यानंतर पुन्हा ते मुद्देमाल कारकूनाकडे देण्यात आले. आम्ही २७ तारखेला पुन्हा ते मुद्देमाल कारकूनाकडून घेतले व पुन्हा त्यांच्या ताब्यात दिले. हे म्हणणे खरे आहे की, ध्वनी मापन यंत्र ताब्यात घेण्याकरीता व परत देण्याकरीता

कोणतेही लेखी पत्र दिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला ध्वनी मापन यंत्र वापरण्याचे ज्ञान नाही.

०८. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. ४४ ते ४९ या दि. २६/०९/२०१५ रोजीच्या रिपोर्टवर माझ्या सह्या घेण्यात आलेल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. ५० ते ५४ वर मी सह्या केलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी क्र. ५० ते ५४ माझ्या समक्ष काढले नसल्यामुळे मी त्यांच्यावर सही केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी कार्यवाही करत होतो त्याबाबतची माहिती पोलीस ठाण्यात देत होतो.

०९. दि. २७/०९/२०१५ रोजी १०:३० वाजताच्या दरम्यान निघालो होतो. हे म्हणणे खरे आहे की, दि. २७/०९/२०१५ रोजी २१:३९ वाजता आम्ही जरीमरी मंदीर येथे ध्वनी मापन घेण्याकरीता गेलो असता ध्वनी मापन यंत्रामध्ये एरर दाखवून नादुरुस्त झाले. सदर बाबत मी पोलीस निरीक्षक कक्ष, नवी मुंबई तसेच वायरलेस विभाग स.पो. उपनिरीक्षक वाकडे यांना कळवले. तसेच न्हावा शेवा पोलीस ठाणे यांचेकडील ध्वनीमापन यंत्र उपलब्ध करण्याकरीता मोहीते व धारकर यांना रवाना केले. मला हे आठवत नाही की नक्की काय झाले होते. नवीन ध्वनी मापन यंत्र आम्हाला मिळाले होते. हे म्हणणे खरे आहे की, नवीन मापन यंत्र हे वैभव माने हेच वापरत होते. मला हे आठवत नाही की, जुने ध्वनी मापन यंत्र आपोआप पुन्हा चालू झाले होते. वैभव माने हे पोलीस शिपाई होते.

१०. प्रिंट आऊट मिळण्यासाठी आम्ही वैभव माने यांना लेखी पत्र दिले नव्हते. ढोलताशा पथकाचा ठेकेदार यांच्या पंचनाम्यावर सह्या घेतल्या नव्हत्या. माझा जबाब मी स्वत:च घेतला होता. जबाब देताना मी सांगितले नव्हते की, मंडळाचे अध्यक्ष यांना पंचनाम्याची प्रत देताना ती नाकारली होती व ध्वनी मापन यंत्राच्या नोंदीची प्रत त्यांनी नाकारली होती. हे म्हणणे खरे नाही की, ध्वनी मापन यंत्राच्या

नोंदीच्या प्रिंट आऊट काढल्या व दि. २७/०९/२०१५ रोजीच्या होत्या हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचनाम्याच्या प्रती त्यांना देत होतो व त्या त्यांनी नाकारल्या हे मी खोटे सांगत आहे. निशाणी क्र. ५० ते ५४ हे इलेक्ट्रॉनिक डेटा आहे.

११. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. ५१ वर मंडळाचे नाव प्रिंट आऊट घेतल्यानंतर हाती लिहीलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, रिसीट संदर्भात ६५—ब चे प्रमाणपत्र नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी बनावट रिसीट केसकामी दाखल केलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी त्या दिवशी कोणताही पंचनामा केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी कोणतेही ध्वनी मापन करण्यासाठी गेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी मशीनचा कॅलीब्रेशन रिपोर्ट दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, खराब ध्वनी मापन यंत्राच्या आधारे खोट्या केसेस दाखल केलेल्या आहे. हे म्हणणे खरे नाही की, श्री गणेश उत्सव मंडळ यांनी कोणतेही ध्वनी प्रदूषण केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी महेश बालदी याचा त्या मंडळाशी कोणताही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **०५/०१/२०२६**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड—अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **८३/२०२०**
निशाणी क्र. **७९/क**

**<u>कलम २४४(१) फौजदारी प्रक्रिया संहिता अन्वये दोषारोपापूर्वीचा पुरावा</u>**

**फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०४ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

माझे संपूर्ण नांव : **वैभव रावसाहेब माने**
वय सुमारे : ४० वर्षे, व्यवसाय : पोलीस नाईक ब.क्र. ३१०६
सध्या नेमणूक : वाशी पोलीस ठाणे, नवी मुंबई

**<u>सरतपासणी फिर्यादी पक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. प्रसाद पाटील यांचेमार्फत</u>**:

०१. दि. २७/०९/२०१५ रोजी मी उरण पोलीस ठाणे येथे पोलीस शिपाई म्हणून कार्यरत होतो. त्यादिवशी गणेश विसर्जन होते. विविध मंडळांचे ढोलताशे वाजत होते. त्या दिवशी मी ध्वनी प्रदुषण पथकामध्ये ध्वनीयंत्र मापक म्हणून कार्यरत होतो. वरिष्ठांच्या आदेशाने माझी नेमणूक करण्यात आली होती. त्या दिवशी पूर्ण दिवस व रात्र माझी ध्वनीयंत्र मापक म्हणून ड्युटी होती. त्यादिवशी २२.३० वाजता स्टेशन डायरी क्र. ३५ मध्ये नोंद करुन पथक प्रमुख पोलीस उपनिरीक्षक काशिनाथ माने, मी, पोलीस नाईक २०१० मोहीते, पोलीस शिपाई रितेश धारकर ब.क्र. २८७६, तसेच पंच विकास पाटील, काशिनाथ गावंड, व्हिडीओग्राफर विशाल तांडेल यांच्यासह आम्ही उरण पोलीस ठाण्याच्या हद्दीत रवाना झालो. २२.३८ वाजता फ्रेश कॉर्नर, उरण येथे पोहोचलो असता काशिनाथ पाटील यांचे सिद्धीविनायक मंडळ येथे ढोलताशे वाजत होते. त्यांना पथक प्रमुखांनी सांगितले की, तुमच्या ढोल ताशांचा आवाज जास्त आहे कमी करा. त्यांनी ऐकले नाही व तसेच चालू ठेवले. त्यामुळे तेथे रिडींग घेतली असता १०३ डेसिबल इतके रिंडींग आले त्यावेळी तेथे रिंडींगची प्रिंट काढली.

पंचांनी व मी सही केली. आता मला दाखवण्यात आलेली निशाणी क्र. ५० कडील रिडींगची प्रत तिच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे.

०२. त्यानंतर आम्ही आयडीयल बाजार येथे रात्री १०.४५ वाजता पोहोचलो असता तेथे महेश बालदी यांचे श्रीगणेशोत्सव मंडळ येथे ढोलताशा पथकांचे ढोल ताशे वाजविणे चालू होते. त्यावेळी अध्यक्ष व मंडळाच्या सदस्यांना तुमच्या ढोल ताशांचा आवाज जास्त आहे कमी करा. त्यांनी ऐकले नाही व तसेच चालू ठेवले. त्यामुळे तेथे रिडींग घेतली असता १०८.४ डेसिबल इतके रिंडींग आले. त्यावेळी तेथे रिंडींगच्या तीन प्रिंट काढल्या. त्यावर पंचांच्या सह्या घेतल्या. एक प्रिंट श्रीगणेशोत्सव मंडळाला दिली परंतु त्यांनी घेण्यास नकार दिला. एक प्रिंट चार्जशीटसोबत दाखल केलेली आहे. आता मला दाखवण्यात आलेली रिडींग रिपोर्टची प्रिंट निशाणी क्र. ५१ तिच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे.

०३. त्यानंतर आम्ही कामठा रोड येथील जयशिवराय गणेशोत्सव मंडळ येथे रात्री ११.०० वाजता गेलो. त्या मंडळाचे अध्यक्ष सचिन कदम तेथे हजर होते. तुमच्या ढोल ताशांचा आवाज जास्त आहे कमी करा. त्यांनी ऐकले नाही व तसेच चालू ठेवले. त्यामुळे तेथे रिडींग घेतली असता ९९.८ डेसिबल इतके रिंडींग आले. त्यावेळी तेथे रिंडींगच्या तीन प्रिंट काढल्या. त्यावर पंचांच्या सह्या घेतल्या. एक प्रिंट मंडळाच्या अध्यक्षाला दिली परंतु त्यांनी घेण्यास नकार दिला. एक प्रिंट चार्जशीटसोबत दाखल केलेली आहे. आता मला दाखवण्यात आलेली रिडींग रिपोर्टची प्रिंट निशाणी क्र. ५२ तिच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे.

०४. त्यानंतर आम्ही निरंजन नार्वेकर यांच्या सार्वजनिक गणेशोत्सव

मंडळ देवूळ आळी, येथे रात्री ११.१० वाजता गेलो. त्या मंडळाचे अध्यक्ष निरंजन नार्वेकर तेथे हजर होते. तुमच्या ढोल ताशांचा आवाज जास्त आहे कमी करा. त्यांनी ऐकले नाही व तसेच चालू ठेवले. त्यामुळे तेथे रिडींग घेतली असता १०१.१ डेसिबल इतके रिंडींग आले. त्यावेळी तेथे रिंडींगच्या तीन प्रिंट काढल्या. त्यावर पंचांच्या सह्या घेतल्या. एक प्रिंट मंडळाच्या अध्यक्षाला दिली परंतु त्यांनी घेण्यास नकार दिला. एक प्रिंट चार्जशीटसोबत दाखल केलेली आहे. आता मला दाखवण्यात आलेली रिडींग रिपोर्टची प्रिंट निशाणी क्र. ५३ तिच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे.

०५. त्यानंतर आम्ही पेडणेकर ज्वेलर्सच्या समोर गेलो. तेथील जय शिवराय गणेशोत्सव मंडळ कोट नाका, येथे रात्री ११.२३ वाजता गेलो. त्या मंडळाचे अध्यक्ष विशाल गायकवाड तेथे हजर होते. तुमच्या ढोल ताशांचा आवाज जास्त आहे कमी करा असे त्यांना सांगितले परंतु त्यांनी ऐकले नाही व ढोल ताशे वाजविणे तसेच चालू ठेवले. त्यामुळे तेथे रिडींग घेतली असता ८५. ९ डेसिबल इतके रिंडींग आले. त्यावेळी तेथे रिंडींगच्या तीन प्रिंट काढल्या. त्यावर पंचांच्या सह्या घेतल्या. एक प्रिंट मंडळाच्या अध्यक्षाला दिली परंतु त्यांनी घेण्यास नकार दिला. एक प्रिंट चार्जशीटसोबत दाखल केलेली आहे. आता मला दाखवण्यात आलेली रिडींग रिपोर्टची प्रिंट निशाणी क्र. ५४ तिच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे.

०६. त्यानंतर आम्ही पोलीस ठाण्यात आलो. पोलीस ठाण्यात आल्यानंतर व्हीडीओग्राफर विशाल तांडेल यांनी घेतलेल्या व्हिडीओच्या सीडी तयार केल्या. त्याचा पंचनामा तयार केला. त्यानंतर सीडी सिलबंद केल्या. वरील सर्व ठिकाण हे रहिवाशी क्षेत्र (रेसिडेन्शीयल एरीया) असल्यामुळे आवाजाची

उच्चतम ध्वनी तीव्रता दिवसा ५५ डेसिबल पेक्षा कमी असणे आवश्यक होते तर रात्री आवाजाची उच्चतम ध्वनी तीव्रता ४५ डेसिबल पेक्षा कमी असणे आवश्यक होते. मंडळाने वाद्य वाजविले होते व आरोपी हे मंडळाचे अध्यक्ष होते त्यामुळे त्यांच्याविरुद्ध केस दाखल करण्यात आली. आरोपींना पाहिल्यास मी ओळखू शकेन. आज रोजी आरोपी कोर्टात हजर नाहीत. (आरोपीच्या वकीलांनी अर्जात नमूद केले आहे की ते आरोपीची ओळख आव्हानीत करणार नाहीत म्हणून अर्ज मंजूर करण्यात आलेला आहे.)

**सरतपास पूर्ण**.

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. अंकीत बंगेरा तर्फे वकील श्री. अदित्य गावंड यांचेमार्फत** :

उलटतपास दोषारोप निश्चित होईपर्यंत तहकूब करण्यात आला.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )

दिनांक : **१०/११/२०२५**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. अंकीत बंगेरा यांचेमार्फत</u>: (**दृक–श्राव्य प्रणालीद्वारे**)

०७. माझे शिक्षण १२ वी आर्टस्पर्यंत झालेले आहे. ध्वनी मापन यंत्र हाताळण्याचे मी प्रशिक्षण घेतल्याचे प्रमाणपत्र माझ्याकडे नाही. ध्वनी मापन यंत्र तीन भागांमध्ये असते. एक मशिन, एक कॅलीब्रेशन व एक प्रिंटर या स्वरुपात असते. मशिन व कॅलिब्रेशन सेलवर चालतात व प्रिंटर चार्जिंग बेस्ड आहे. या केसकामी मी दि. २७/०९/२०१५ रोजी ध्वनी मापन यंत्र ताब्यात घेतले होते. पी.एस्.आय्. काशिनाथ माने यांनी ध्वनी मापन यंत्र माझ्या ताब्यात दिले. या केसपूर्वी ती मशीन भरपूर वेळा वापरण्यात आली होती. त्या दिवशी कॅलीब्रेशनमध्ये थोडा बिघाड झाला होता. आम्ही नवीन मशीन मागवले होते परंतु आम्ही आमचेच मशीन वापरले होते. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, सेल नवीन टाकल्यावर मशीन चालू झाली. नवीन सेल टाकल्याबाबत पंचनाम्यात लिहीलेले नाही.

०८. दि. २७/०९/२०१५ रोजी आम्ही पाच मंडळांच्या रिडींग मशीनद्वारे घेतल्या होत्या. एक रिडींग झाल्यानंतर प्रत्येक वेळा रिडींग घेण्यापूर्वी व रिडींग घेतल्यानंतर प्रत्येक वेळी कॅलीब्रेशन केले जात होते. कॅलीब्रेशन घेतल्याबाबत रिपोर्ट रिडींगच्या प्रिंट आऊटमध्येच येते. प्रिंट आऊटवर के.सी. माने यांची सही घेतली असावी. एक प्रत मंडळाच्या अध्यक्षांना देण्यात आली होती परंतु त्यांनी ती घेण्यास नाकारली होती. नाकारलेली प्रिंट आम्ही त्यांना दिलीच होती.

०९. हे म्हणणे खरे आहे की, प्रिंट आऊटबाबत आम्ही भारतीय पुरावा कायदा कलम ६५–ब चे प्रमाणपत्र दिलेले नाही. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, ह्या मशीनला भारतीय पुरावा कायदा कलम ६५–ब चे प्रमाणपत्र लागू होत नाही. मशीन सुस्थितीत असल्याबाबतचे प्रमाणपत्र केसमध्ये दाखल आहे. हे म्हणणे खरे आहे की, ढोलताशा पथकावर कार्यवाही करण्यात आली नाही व त्यांचा ढोल ताशा जप्त करण्यात आला नाही.

१०. हे म्हणणे खरे नाही की, कोणतेही ध्वनी प्रदूषण झाले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे आम्ही कोणतेही सामान जप्त केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **०५/०१/२०२६**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.